
Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)



ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
Marathi Part - IV

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

# CONTENTS OF MARATHI PART - IV



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| २७ | जागतिकीकरणानंतर भारतीय शेतीतील बदल<br>**प्रा. सुरज टिलावत**<br>**प्रतिक गुलालकरी** | १११-११४ |
| २८ | शेतकरी संघटनांच्या चळवळी व आंदोलने<br>**प्रा. अंजली डी. बर्डे** | ११५-११६ |
| २९ | भारतीय अर्थव्यवस्थेत कृषिचे महत्त्व<br>**प्रा. गणेश काकडे** | ११७-१२१ |
| ३० | शेतकऱ्यांच्या आत्महत्या अर्थव्यवस्थेसमोरील आव्हान<br>**प्रा. केवल कराडे**<br>**डॉ. सुनिल शिंदे** | १२२-१२८ |
| ३१ | शेतकरी आत्महत्या समस्या व उपाययोजना<br>**डॉ. महेंद्र भि. भगत** | १२९-१३३ |
| ३२ | ग्रामीण साहित्य एक सामाजिक दृष्टीक्षेप<br>**प्रा. अतुलकुमार हरिभाऊ महाले** | १३४-१३८ |
| ३३ | कृषी मूल्य विश्लेषण आणि विपणन व्यवस्था<br>**डॉ. हिप्पळगावकर आर. ए.** | १३९-१४१ |
| ३४ | मराठी साहित्य आणि भारतीय शेतकऱ्यांच्या समस्या व आव्हाने<br>**प्रा. डॉ. सुनिल शिवलाल राठोड** | १४२-१४५ |
| ३५ | सामाजिक प्रथा, परंपरा व सामूदायिक विकास<br>**डॉ. डि. एम. मोहोड** | १४६-१५० |

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)**

# ३०. शेतकऱ्यांच्या आत्महत्या अर्थव्यवस्थेसमोरील आव्हान

**प्रा. केवल कराडे**
कर्मविर महाविद्यालय, मुल.
**डॉ. सुनिल शिंदे**
भिवापूर महाविद्यालय, भिवापूर.

शेतकऱ्यांच्या आत्महत्येवर मिडीया, वर्तमानपत्रे ,चर्चासत्रे इत्यादीच्या माध्यमातून बरीच चर्चा सुरू आहे. ह्यामध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्यांवर चर्चा सुरू असुन या चर्चेच्या माधमातून आत्महत्यांच्या कारणाचा शोध घेतला जाऊन आत्महत्या रोखण्यासाठी शासनाने, सामाजिक संस्थानी आणि स्वतः शेतकऱ्यांनी काय केले पाहीजेत यावर उपायोजना सुचविली जात आहे. त्यामुळे प्रस्तुत चर्चासत्रामध्ये शेतकऱ्यांच्या जिवनावर प्रकाश टाकण्याचा संशोधकाचा अल्पसा प्रयत्न आहे.

अभ्यास विषयाचे महत्व

१. भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीचे महत्व समजुन घेणे.
२. शेती व शेतकऱ्यांच्या समस्यांचा शोध घेणे.
३. शेतकऱ्यांच्या आत्महत्या संदर्भातील कारणांचे मुळ शोधने.
४. शेतकऱ्यांच्या आत्महत्यावर उपाय सुचविणे

- इंग्रजी राजवटीपुर्विच्या आणि नंतरच्या भारताची स्थिती

भारताला कधी काळी सोन्याचा धुर निघणारा देश म्हटले जायचे या देशात एक म्हण फार प्रचलित होती 'उत्तम शेती,मध्यम व्यापार व कनिष्ठ नौकरी' आज मात्र म्हटले जाते 'उत्तम नौकरी, मध्यम व्यापार आणि कनिष्ठ शेती' अशी स्थिती का निर्माण झाली याचा शोध घेण्याची वेळ आली आहे. अगदी प्राचिन काळापासून भारतीय अर्थव्यवस्था कृषीप्रधान अर्थव्यवस्था आहे. स्वातंत्र्याच्या 63 वर्षानंतरही त्यामध्ये फारसा फरक पडला नाही. आजही कृषी हाच भारतीय अर्थव्यवस्थेच्या पाठीचा कणा आहे. आणि शेतकरी 121 कोटी भारतीयांचे आधारस्तंभ आहेत. मानवाची सर्वात महत्वाची गरज म्हणजे अन्न सर्वांना जगण्यासाठी अन्न लागते आणि अन्न पिकविणाऱ्या अन्नदात्याची मात्र अन्नान्न दशा होत आहे. त्याच्यावर अर्धपोटी, उपाशी राहण्याची वेळ आली आहे. गेल्या अनेक वर्षापासून शेतकरी आत्महत्या करीत आहेत. इंग्रजी राजवट आणि स्वातंत्र्योत्तर भारताच्या 63 वर्षात काय फरक पडला याचा गार्भियाने विचार करण्याची गरज आहे.

इंग्रजी राजवटीअगोदरचा भारताचा इतिहास अतिशय वैभवशाली शिखरावर होता. भारतीय खेडी स्वयंपुर्ण होती. खेड्यातील लोकांच्या गरजा कमी आणि खेड्यामध्येच पुर्ण केल्या जायच्या. शेती ह्या प्रमुख व्यवसायासोबतच ग्रामिण भागामध्ये कुटीर उद्योगांचे जाळे पसरले होते. ग्रामिण भागातील लोकांना

शेतीसोबतच कुटीर उद्योगांमध्ये रोजगार मिळत होता. भारतीय कुटीर उद्योगातून तयार होणाऱ्या हस्तकौशल्याच्या वस्तुंना जगभर मागणी होती. भारताच्या ग्रामिण भागात शेतकऱ्यांची कामे करणारी बलुतेदारी व अलुतेदारी पध्दती अस्तित्वात होती. शेतकऱ्याची शेतीशी संबंधित कामे करण्याची जबाबदारी 12 बलुतेदाराकडे होती. तर 18 अलुतेदार शेतीशी संबंधित नसलेली कामे करायचा. एकंदरीत ग्रामिण भारतीय जीवन सुखी व समाधानी होते. परंतु 16 व्या शतकात इंग्रजांच्या भारतातील प्रवेशामुळे वैभवशाली भारताला उतरती कळा लागली. इस्ट इंडिया कंपनीच्या माध्यमातून भारतामध्ये व्यापारासाठी आलेल्या इंग्रजांनी हळुहळू भारताची सत्ता काबीज करण्यासाठी कुटील कारस्थान रचले. भारतीय राजेशाही मोडीत काढत भारताच्या कुटीर उद्योगाचा ऱ्हास करण्यासाठी संपुर्ण भारतात रेल्वेचे जाळे तयार केले. रेल्वे वाहतुकीद्वारे ग्रामिण भागातील कच्चा माल स्वस्त दरात इंग्लंडमध्ये पाठवून पक्का माल भारतामध्ये आणला. भारतीय कुटीर उद्योगांना कच्चा माल मिळणार नाही असे धोरण राबविले त्याचा वाईट परीणाम भारतातील कृषीवर आधारीत उद्योगावर झाला. उद्योगधंदे बंद पडायला लागले. त्यामुळे एकेकाळी वैभवाच्या शिखरावर असलेल्या भारताला उतरती कळा लागली व भारताचे विदेशावरचे परावलंबित्व वाढले.

- भारतीय शेतीचे स्वरूप

भारताची लोकसंख्या 2011 च्या जनगणनेनुसार 121 कोटी आहे. जागतिक लोकसंख्येच्या 17.5 टक्के लोकसंख्या भारतात राहते. शेतीवर अवलंबुन असलेल्या लोकसंख्येचे प्रमाण 61 टक्के असून राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा 19 टक्यांच्या आसपास आहे. भारताचे क्षेत्रफळ 32,87,263 चौ.कि.मी.असून जगाच्या तुलनेत भारताचे एकूण क्षेत्र 2.42 टक्के,तर क्षेत्रफळाच्या बाबतीत जगात 7 वा क्रमांक लागतो.58 टक्के शेतकऱ्यांच्या शेतीचा आकार 1.57 हेक्टर, 33 टक्के शेतकऱ्यांच्या जमिनीचा आकार 1 हेक्टरपेक्षा कमी आहे. अत्यल्पभुधारक आणि अल्पभुधारक शेतकऱ्याची संख्या जवळपास 90 टक्के आहे. कालवे विहीर व तलाव व इतर माध्यमाद्वारे 39 टक्के शेतीला पाणी पुरवठा होतो. तर 61 टक्के जमिन नैसर्गिक मान्सुनवर अवलंबुन आहे. भारतात जवळपास 53 टक्के क्षेत्र जमिनी योग्य आहे. कृषी उत्पन्नाच्या बाबतीत चिननंतर भारताचा दुसरा क्रमांक लागतो. भारताचे कृषी उत्पन्न 333.65 बीलीयन अमेरीकन डॉलर आहे. मनुष्यबळाच्या बाबतीतही भारताचा दुसरा क्रमांक आहे. भारताचे कृषी क्षेत्र चिनपेक्षा 4.5 पट अधिक आहे परंतु उत्पन्न मात्र चिनपेक्षा 50 टक्के कमी आहे. शेतीसाठी भारतात सुपीक जमिन आहे. पर्जन्यमान व वातावरण अनुकुल आहे. परंतु तुलनात्मक उत्पन्नाच्या बाबतीत भारत जागतिक स्तरावार बराच मागे आहे.

- भारतातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यासंदर्भातील स्थिती

कर्जाचा डोंगर, गरीबी, अचानक आलेली संकटे, दारीद्रय या परिस्थितीतून मार्ग न निघाल्याने गेल्या 16 वर्षात तब्बल 2 लाख 90 हजार 740 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे वास्तव केंद्रीय कृषी राज्यमंत्री हरीश रावत यांनी राज्यसभेत मांडले. कर्जमाफी, मदतिचे पॅकेज, व्याजदरात सवलत अशा सरकारी घोषणा वारंवार होऊनही शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण मोठे असल्याचे स्पष्ट झाले आहे. सन

1995 ते 2011 या काळात शेतकरी, शेतमजूर आणि या क्षेत्राशी निगडीत व्यवसाय करणाऱ्या 2 लाख 70 हजार 740 जणांनी आत्महत्येचा मार्ग पत्करल्याचे भारतातील अपघाती मृत्यू आणि आत्महत्यांच्या नोंदीमुळे स्पष्ट झाले आहे. नॅशनल क्राइम रेकॉर्ड्स ब्युरोने वार्षिक अहवालात ही माहिती उपलब्ध करून दिली असल्याचे रावत यांनी सभागृहाला सांगितले. पुढील तक्त्यामध्ये दिलेल्या भारतातील पाच मोठ्या राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या आकडेवारीवरून लक्षात येईल.

| वर्ष | महाराष्ट्र | आंध्रप्रदेश | कर्नाटक | मध्यप्रदेश छत्तीसगड | 5 मोठ्या राज्यातील आत्महत्या | देशभरातील शेतीसंबंधित आत्महत्या | 5 मोठ्या राज्यांचा वाटा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1995 | 1083 | 1196 | 2490 | 1239 | 6008 | 10720 | 56.04 |
| 1996 | 1981 | 1706 | 2011 | 1809 | 7507 | 13729 | 54.68 |
| 1997 | 1917 | 1097 | 1832 | 2390 | 7236 | 13622 | 53.12 |
| 1998 | 2409 | 1813 | 1883 | 2278 | 8383 | 16015 | 52.34 |
| 1999 | 2423 | 1974 | 2379 | 2654 | 9430 | 16082 | 58.64 |
| 2000 | 3022 | 1525 | 2630 | 2660 | 9837 | 16603 | 59.25 |
| 2001 | 3536 | 1509 | 2505 | 2824 | 10304 | 16415 | 63.20 |
| 2002 | 3695 | 1896 | 2340 | 2578 | 10509 | 17971 | 85.48 |
| एकूण | 20066 | 12716 | 18070 | 18432 | 69284 | 121157 | 57.19 |
| | | | | | | | |
| 2003 | 3836 | 1800 | 2678 | 2511 | 10825 | 17164 | 63.07 |
| 200[illegible] | 4147 | 2666 | 1963 | 3033 | 11809 | 18241 | 64.74 |
| 2005 | 3926 | 2490 | 1883 | 2660 | 10959 | 17131 | 63.97 |
| 2006 | 4453 | 2607 | 1720 | 2858 | 11638 | 17060 | 68.22 |
| 2007 | 4238 | 1797 | 2135 | 2856 | 11026 | 16632 | 66.29 |
| 2008 | 3802 | 2105 | 1737 | 3152 | 10796 | 16196 | 66.66 |
| 2009 | 2872 | 2414 | 2282 | 3197 | 10765 | 17368 | 61.98 |
| 2010 | 3141 | 2525 | 2585 | 2363 | 10614 | 15964 | 66.49 |
| 2011 | 3337 | 2206 | 2100 | 1326 | 8969 | 14027 | 63.94 |
| एकूण | 33752 | 20610 | 19083 | 23956 | 97401 | 149783 | 65.03 |
| | | | | | | | |
| 1995 ते 2011 | 53818 | 33326 | 37153 | 42388 | 166685 | 270940 | 61.52 |

वरील तक्त्यामध्ये महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, कर्नाटक, मध्यप्रदेश आणि छत्तीसगड या भारतातील पाच मोठ्या राज्यातील 1995 ते 2011 या वर्षामध्ये शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्येची आकडेवारी दिलेली आहे. ह्या काळात देशात एकूण 270940 शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या होत्या त्यामध्ये या पाच राज्यातील

शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची संख्या 166685 होती व हे प्रमाण देशातील एकूण आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या तुलनेत 61.52 टक्के होते.

- शेतकऱ्यांच्या आत्महत्येमागील कारणे

शेतक- यांच्या आत्महत्यामागील महत्वाचे कारण जे आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या अभ्यासाच्या सर्व्हेवरून सिध्द झाले आहे. ते म्हणजे शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा होय. भारतीय शेतकऱ्यांच्या बाबतीत एक म्हण प्रचलित आहे. 'भारतीय शेतकरी कर्जातच जगतो, कर्जातच मरतो आणि कर्जातच जगतो' त्यामुळे भारतीय शेतकरी कर्जबाजारी का झाला ह्याची कारणे पुढीलप्रमाणे सांगता येईल.

- शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणाची कारणे.

1) शेतमालाला रास्त भाव नाही.:–भारतामध्ये शेतमालाच्या न्युनतम आधारमूत किंमती ठरविण्याच्या पध्दतीमध्ये व्यावहारीकता नाही. किंमती निश्चित करतांना शेतमालाचा उत्पादन खर्च विचारात घेतला जात नाही.

2) उत्पादन खर्च वाढता आहे.:– दिवंसेदिवस शेतमालाचा उत्पादन खर्च वाढत आहे. खतांचे भाव, शेतीचा अवजारे, किटकनाशकांच्या किंमती आणि श्रमिकांचा मजुरी वाढतच असून उत्पादन खर्चावर कोणाचेच नियंत्रण नाही. महागाई वाढली म्हणून सरकार किमान मजुरीच्या दरात वाढ करत असते.

3) शासनाचे अंतर्गत व विदेशी व्यापारविषयक धोरण:–शासनाचे अंतर्गत व विदेशी व्यापारविषयक धोरण शेतकऱ्यांच्या हिताचे नाही. बाजारात ज्यावेळेस शेतमालाच्या किंमती चएत असतात त्यावेळी महागाईच्या नावावर सरकार किंमती कमी करण्यासाठी संबंधित शेतमालाची विदेशातून आयात करून शेतमालाच्या किंमती पाडल्या जातात.

4) भांडवलाचा अभाव:– भांडवलाच्या अभावामुळेच शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा दिवंसेदिवस वाढत आहे. 90 टक्के शेतकऱ्यांना शेतीसाठी लागणारे भांडवल कर्जाऊ घ्यावे लागते.

5) शासनाची शेतीला दुय्यम वागणूक:– शेतीला सर्वच बाबतीत सरकारकडून गौन महत्व प्राप्त होत आहे. कोणताही व्यवसाय हा नफा देणारा नसला तरी त्यातुन तोटा होवू नये परंतु वर्षनुवर्ष शेती व्यवसाय तोट्यामध्ये सुरू आहे. सरकारचे धोरण शेतकऱ्यांच्या फायद्याचे नसून उद्योगपतींना सहाय्य करणारे आहे.

6) दर दोन ते तीन वर्षानी दुष्काळसदृश स्थिती:– शेतकऱ्यांच्या आर्थिक दैनावस्थेची पाहनी करतांना असे लक्षत आले की, भारतामध्ये दर दोन ते तीन वर्षानंतर कधी अती पावसामुळे तर कधी कमी पावसामुळे तर कधी रोगराईमुळे शेतकऱ्याच्या हातातले पीक निघुन जाते. त्यामुळे शेतकऱ्यांनी शेतीसाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड होत नाही व शेतकरी कर्जाच्या सापळ्यात सापडतो.

7) शेतकऱ्यांच्या सबसिडीमध्ये कपात:–शेतीसाठी सरकारतर्फे सवलती दिल्या जातात. त्यातील अनेक सवलतीचा फायदा शेतकऱ्यांना न होता शेतीसाठी औद्योगिक वस्तुचा पुरवठा करणाऱ्या उद्योजकांना होतो.

8) सिंचनाच्या सोयीचा अभावः—स्वातंत्र्याच्या 65 वर्षानंतरसुध्दा अधिकांश भारतीय शेती नैसर्गिक मान्सुनवर अवलंबून आहे. मोठे,मध्यम आणि लघु सिंचन प्रकल्पाची निर्मिती करून शेतीला पाणीपुरवठा करण्यासाठी केलेले प्रयत्न अपुरे पडल्यामुळे शेतकऱ्यांना निसर्गाच्या मर्जिवर अवलंबुन राहावे लागते.

9) विजेच्या भारनियमात वाढः— ग्रामिण भागात 10 ते 15 तास भारनियमन केले जात आहे. याचा सर्वाधिक फटका शेतीला बसला आहे. अनेक शेतकऱ्यांकडे स्वतःची सिंचनाची साधने आणि विजेचे पंप असूनसुध्दा भारनियमामुळे शेतीला नियमित पाणीपुरवठा करता येत नाही.

10) एकाच पिकावरचे अवलंबित्वः—अनेक शेतकरी वर्षानुवर्ष शेतीमध्ये एकाच प्रकारचे पिक घेतात. अशावेळी या पिकासाठी आवश्यक नैसर्गिक परिस्थिती उपलब्ध नसेल काही कारणाने शेतमालाचे भाव पडले तर शेतकऱ्याला अतोनात नुकसान सहन करावे लागते.

11) श्रमिकांची समस्याः— ग्रामिण भागामध्ये सरकारच्या अन्न वितरण प्रणालीमुळे शेतमजुरांमध्ये काम न करण्याची प्रवृत्ती निर्माण झाली आहे. ह्यामुळे शेतकऱ्यांना शेतीसाठी लागणारे श्रमिक मिळणे कठीण झाले आहे. आणि मिळाले तर त्यांना त्यांच्या मर्जिप्रमाणे पैसे मोजावे लागतात.त्यामुळे शेती करणे तारेवरची कसरत बनली आहे.

12) सावकारी कर्जः— भारतामध्ये शेतीला कर्जपुरवठा करण्यासाठी बँकांचे राष्ट्रीयीकरण आणि सहकारी बँकाच्या निर्मितीनंतरसुध्दा शेतकऱ्यांना विशेषतः लहान शेतकऱ्यांना सावकाराकडून कर्ज घ्यावे लागते. एकदा जर का सावकाराकडून कर्ज घेतले की शेतकरा सावकारी कर्जाच्या सापळ्यात सापडून सावकारी कर्जाचा गळफास तयार होतो.134) आत्मविस्वासात घटः—कोणताही व्यवसाय हा व्यवसाय करणाऱ्याच्या आत्मविश्वासावर अवलंबूल असतो. परंतु शेती करतांना सततच्या उद्‌भवणाऱ्या आर्थिक आणि नैसर्गिक समस्यामुळे शेतकरी कमालीचा त्रस्त झाला आहे. यातुनच शेतकऱ्यांमध्ये नैराश्याच्या भावनेची निर्मिती घर करून शेतकऱ्यांचा जिवन जगण्याचा आत्मविश्वास कमी झाला आहे.

13) शेतकऱ्यांचे अज्ञानः—सर्वसामान्य शेतकऱ्यांना स्वतःच्या अज्ञानामुळे स्वतःला काय पाहजे याची पुर्ण कल्पना नाही. आपल्याला सतत कर्ज का घ्यावे लागते व कर्जमुक्तीसाठी कोणती मागणी योग्य व अयोग्य याबाबत त्याची कल्पना स्पष्ट नाही.

14) कौटूंबिक जबाबदारीः— मुलामुलीचे शिक्षण, लग्नकार्य,सामाजिक व धार्मिक विधी इत्यादी कार्याची पुर्तता करतांना शेतकऱ्याचा खर्च वाएत आहे. परंतुत्यातुलनेत उत्पादन होत नाही त्यामुळे कौटूंबिक जबाबदारी पुर्ण करण्यासाठी कर्ज घेण्याची वेळ शेतकऱ्यावर आलेली आहे.

15) कर्जबाजारीपणामुळे निर्माण झालेली व्यसनाधिनता:— दोन तीन वर्षातुन निर्माण होणारी नापिकी, शेतमालाच्या पडणाऱ्या किंमती, वाढता कौटूबिक खर्च ह्यामुळे अनेक शेतकरी व्यसनाधिनतेच्या आहारी जाऊन स्वतःचे जिवन संपविलेले आहे.

जागतिक 'कौटूंबिक शेती वर्ष' 2014

आज जग कितीही पुढारलेले असले तरी जगातील बहुतांश देशामध्ये शेतकऱ्यांची कुटूंबे आपल्या घरच्या शेतात वर्षभर राबतात. या शेतकऱ्यांच्या कुटूंबामुळेच जगाची भुक मिटत आहे. आपल्या शेतीवर

जिवापाड प्रेम करणाऱ्या ,नैसर्गिक, राजकीय तसेच बाजारातील संकटाचा जिद्दीने सामना करून जगाचे पोट भरण्याचे कार्य करणाऱ्या या शेतकरी कुटूंबाप्रती आदर आणि आभार व्यक्त करण्याच्या उद्देशाने संयुक्त राष्ट्रसंघाने 2014 हे वर्ष 'कौटूंबिक शेती वर्ष' म्हणुन साजरे करण्याचे ठरविले आहे. या शेतकरी कुटूंबांना प्रोत्साहन देऊन जगाची अन्नसुरक्षा साधने आणि गरीबी टिविणे ही उद्दिष्टही या उपक्रमात ठेवण्यात आली आहे.

याबाबत एमएफओचे महासंचालक जोस ग्राझियानो म्हणाले ''जगाची अन्नसुरक्षा राखने आणि शाश्वत शेती करणे,यासाठी शेतकरी कुटूंबाचे मोठे योगदान आहे.बदलत्या जगामध्ये या कुटूंबाचे महत्व आणखी वाढले आहे. जगातील भूकमारी, कुपोषण हटविणे, रोजगारसंधी वाढविणे या कामी शेतीला आणि पर्यायाने शेतकरी कुटूंबांना मोठी जबाबदारी उचलावी लागणार आहे. म्हणूनच आगामी वर्ष हे 'कौटूंबिक वर्ष' ही संकल्पना ठेवून अशा शेती उत्पादन, उत्पादकता वाढविण्यासाठी शेतकरी कुटूंबांना प्रोत्साहन द्यावे'

आत्महत्या थांबविण्यासाठी उपाययोजना

शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्यासाठी व त्यांना स्वाभिमानाने जिवन जगण्यासाठी पुढील उपाययोजना करण्याची गरज आहे.

१. शासनाचे कृषी धोरण शेतकऱ्यांना पोषक असले पाहीजे
२. उत्पादनखर्चावर आधारीत किंमत धोरण असावे.
३. कमी व्याजदराने कर्जपुरवठा
४. सिंचनाची साधने उपलब्ध्द व्हावी
५. शेतमालाचा उत्पादन खर्च कमी व्हावा
६. नापिकीच्या काळात आर्थिक मदत
७. लघु व मध्यम सिंचन प्रकल्पाची निर्मिती
८. शेतीपुरक व्यवसायासाठी शासनाची मदत
९. नविन उत्पादन तंत्राचा अवलंब
१०. शेतीसाठी स्वतंत्र अर्थसंकल्प तयार करावा
११. शेतमालाच्या बाजार व्यवस्थेत शासनाचे नियंत्रण असले पाहीजे.

शेतकऱ्याच्या स्वतःच्या उपायोजना

१. शेतकऱ्यांनी व्यावसायीक दृष्टीकोन जोपासला पाहीजे
२. शेतिव्यतीरीक्त खर्चात काटकसर केली पाहीजे.
३. सामाजिक परंपरेवरील अतिरीक्त खर्च टाळला पाहीजे.
४. शेतीसाठी घेतलेल्या कर्जावा योग्य उपयोग केला पाहीजे.
५. कर्जाची परतफेड करण्यास प्राधान्य दिले पाहीजे.

६. नैराश्याची भावना टाळून व्यसनाधिनतेच्या आहारी जावू नये.

७. केवळ जुने रीतीरिवाज पाळायचे म्हणुन पैशाची उधळपटी अगोदर थांबविली पाहिजे.

८. फलोत्पादन, कृषीपंढरी या आणि अशा अनेक चांगल्या योजनांची वाट लागली आहे. ह्या योजनांचा योग्य फायदा शेतकऱ्याकडून घेतला पाहिजे.

९. शेतकऱ्यांनी शेती व्यतीरीक्त अन्य उद्योगामध्ये लक्ष घालायला सुरवात केली पाहिजेत.

संदर्भग्रंथ सुची

१. महाराष्ट्राच्या कृषिविकासाचा आढावा, डॉ.लालासाहेब ना. घाटगे सकाळ प्रकाशन

२. सकाळ वृत्तपत्र नागपूर आवृत्ती 1 जानेवारी 2014

३. शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवायच्या कशा?:– दिवाकर गोविंद बोकरे डायमंड प्रकाशन पुणे

४. महाराष्ट्रातील शेती:– डॉ. एम. यु मुलानी/रोहीदास लोहकरे डायमंड प्रकाशन पुणे

५. शेतकऱ्यांच्या समस्या व उपाय:– प्रा.मुकूंद गायकवाड, उत्कर्ष प्रकाशन